पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, जुना मुंबई पुणे रस्ता, पाटीलनगर, रांकागॅस शेजारी, महाविर चौक, चिंचवड स्टेशन, चिंचवड, पुणे.१९
फोन नं.०२०-२७४७२२१८ ईमेल-pspimpri.pcpc-mh@gov.in

प्रेसनोट दि.११/११/२०२४

# देशी बनावटीचे पिस्टल व जीवंत काडतुसे बाळगणारे आरोपींना पिंपरी पोलीस ठाणे तपास पथकाकडुन अटक.

## आरोपींचे ताब्यातुन एकुण ३ देशी बनावटीचे पिस्टल व तीन जीवंत काडतुसे व गुन्हा करण्यासाठी वापरलेली एक होंडा कंपनीची डीओ मोपेड असा एकुण २,०१,७००/-रूपये एकुण किंमतीचा मुद्देमाल हस्तगत-

पिंपरी चिचंवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत विघानसभा निवडणुक २०२४ च्या अनुशंगाने बेकायदेशीर अग्निशस्त्रे व दारूगोळा बाळगणारे गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत मा.श्री विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.श्री डॉ.शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, मा.श्री वसंत परदेशी, अप्पर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी आदेशीत केले आहे. त्यानुसार आम्ही स्वतः तसेच सहा.पोलीस आयुक्त पिंपरी विभाग, सचिन हिरे यांनी अवैध अग्निशस्त्रे बाळगणा-या गुन्हेगारांवर कारवाई करण्याची मोहीम सुरू केली आहे. त्यानुसार आम्ही पिंपरी पोलीस ठाणेचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अशोक कडलग, यांना सदरची मोहीम राबवुन कारवाई करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक ०४/११/२०२४ रोजी पिंपरी तपास पथकाचे पोलीस हवालदार ३२१३ अशोक लक्ष्मण डगळे यांना त्यांचे गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, एक इसम अंगात काळे रंगाचे स्वेटर व पांढरे रंगाची जीन्स पॅन्ट घातलेला हा मुंबई पुणे हायवेरोडवर खराळवाडी पिंपरी पुणे येथे रात्रौ २३/२५ वाजताचे सुमारास कोणालातरी भेटण्यासाठी येणार आहे व त्याचेकडे देशी बनावटीचे पिस्टल आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने पिंपरी पोलीस ठाणे तपास पथकाकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी सापळा रचुन बातमी प्रमाणे एक इसम मुंबई पुणे हायवेरोडवर खराळवाडी पिंपरी पुणे येथे आला व रोडवर उभा राहुन कोणाची तरी वाट पाहत असल्याबाबत खात्री झाल्याने तपास पथकाने शिताफिने सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव मंथन मोहन गायकवाड वय-२२ वर्ष, रा.टकले कॉलनी नंबर ०१, गोपाळपट्टी मांजरी हडपसर पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचे ताब्यात एक देशी बनावटीचे पिस्टल व एक काडतुस मिळुन आले.
**सदर बाबत पिंपरी पोलीस ठाणे येथे गुरजि नं १००८/२०२४, भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

सदर गुन्हयाचा तपास सहा.पोलीस निरीक्षक अतिग्रे, पिंपरी पोलीस ठाणे पिं.चिं. हे करीत असुन, त्यांनी आरोपीची पोलीस कोठडी घेवुन आरोपीकडे तपास केला असता, त्याने त्याचेकडे आणखीन एक पिस्टल असुन ते त्याने इसम नामे चैतन्य आनंदा गुरव रा.वाकी वरकुटे, ता.माण, जि.सातारा यास दिले असल्याचे सांगितले असता, सहा.पोलीस निरीक्षक अतिग्रे यांनी चैतन्य आनंदा गुरव याचे मोबाईलचे लोकेशन घेवुन त्याचे तांत्रिक विश्लेषण केले असता, सदर इसमाचे लोकेशन हे पिंपरी पुणे येथील येत असल्याने, सहा.पोलीस निरीक्षक अतिग्रे यांनी तपास पथकातील पोलीस

अंमलदार यांचेसह मिळालेल्या लोकशन जावुन शोध घेतला असता, त्याचे ताब्यात एक देशी बनावटीचे पिस्टल व एक काडतुस मिळुन आले.

तसेच सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपी मंथन मोहन गायकवाड याचेकडे आणखीन तपास करता, त्याने आणखीन एक पिस्टल त्याचेकडे असलेल्या एक होंडा कंपनीची डीओ मोपेड नं.एम.एच.१२/क्यु.जे.९६८५ मध्ये लपवुन ठेवल्याचे सांगुन सदरची मोटार सायकल लपवुन ठेवल्याचे ठिकाणी दाखवुन सदर मोटार सायकलमध्ये लपवुन ठेवलेले एक देशी बनावटीचे पिस्टल व जीवंत काडतुस व मोटार सायकल काढुन दिली त्याचे वर्णन खालील प्रमाणे-

१) ५०,०००/- रू.किं.चे पांढ-या धातूचे देशी बनावटीचे मॅगझिनसह असलेले पिस्टल, त्या पिस्टलला असलेल्या मुठीस दोन्ही बाजुस काळ्या रंगाचे प्लस्टिकचे कव्हर व त्यास पांढ-या धातूचे मॅगझिन असे जु.वा.किं.अं.
२) ५००/- रु. किं.चा एक जिवंत काडतुस (राऊंड) जु.वा.किं.अं.
३) ५०,०००/- रू.किं.चे काळया धातूचे देशी बनावटीचे मॅगझिनसह असलेले पिस्टल, त्या पिस्टलला असलेल्या मुठीस दोन्ही बाजुस काळ्या रंगाचे प्लस्टिकचे कव्हर व त्यावर स्टारचे चिन्ह असलेले व त्यास पांढ-या धातूची मॅगझिन असेजु.वा.किं.अं.
४) ५००/- रु. किं.चा एक जिवंत काडतुस (राऊंड) जु.वा.किं.अं.
५) २००/-रू. किंमतीची काळे रंगाची कापडी सॅक
६) ५०,०००/- रू.किं.चे पांढ-या धातूचे एक देशी बनावटीचे मॅगझिनसह असलेले पिस्टल, त्या पिस्टलला असलेल्या मुठीस दोन्ही बाजुस काळ्या रंगाचे प्लस्टिकचे कव्हर व त्यास पांढ-या धातूची मॅगझिन असे जु.वा.किं.अं.
७) ५००/- रु. किं.चा एक जिवंत काडतुस (राऊंड) जु.वा.किं.अं.
८) ५०,०००/-रू किं ची एक होंडा कंपनीची डीओ मोपेड नं.एम.एच.१२/क्यु.जे.९६८५ अशी असलेली तिचा इंजिन नं.जेएफ ३९ईयु२२३६७१३ असा असुन चॅसी नं.एमई४जेई३९डीबीजेयु१२८३५३ असा असलेली जुवाकिंअं.

---------------

**२,०१,७००/-रूपये**

------------------------------------------------------------------ooo------------------------------------------------------------------

सदर कामगिरी मा.श्री. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा.डॉ.शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा. श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ १ पिंपरी चिंचवड, मा. श्री सचिन हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो. पिंपरी विभाग पिंपरी चिंचवड, यांचे मार्गदर्शनाखाली अशोक कडलग, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पिंपरी पोलीस ठाणे, धनंजय कापरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी तपास पथकातील सपोनि दिगंबर अतिग्रे, पो.हवा.३२१३ डगळे, पो.हवा. ११६५ बारशिंगे, पो.हवा. ६८४ हांडे, पो.हवा.९७९ बेंदरकर, पो.हवा. ९८२ झांबरे, पोहवा १४२५ शिंदे, पो.ना.१९१७ बंड, पो.शि. २६५७ रेड्डी, पो.शि.२७२२ जानराव, पो.शि.२३५५ वाघमारे, पो.शि.२९७० काकड, पो.शि.३३५७ बजबळकर, पो.शि.३६०९ ढवळे, पोशि ३३१९ पुंडे, पो.शि.३४५३ कवठेकर, मपोहवा १६८८ कोंडे, मपोशि २१७० चव्हाण यांनी केली आहे.

**( स्वप्ना गोरे)**
पोलीसउप-आयुक्त, परि-०१
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय